# Quadrant II – Transcript and Related Materials

**Programme: Bachelor of Arts (Third Year)**

**Subject: Marathi**

**Paper Code: MRD-103**

**Paper Title: प्रसार माध्यमांसाठी लेखन कौशल्य**

**Unit: 2**

**Module Name: माहितीपट:संकल्पना व स्वरूप**

**Module No: 08**

**Name of the Presenter: Mr. Jayesh Gaonkar**

---

**Transcript**

नमस्कार,

गोवा विद्यापीठाच्या तृतीय वर्ष कला शाखेच्या अभ्यासक्रमात समाविष्ट केलेल्या 'प्रसार माध्यमांसाठी लेखन कौशल्य' या पेपरमधील द्वितीय श्रेयांकनावर आज आपण चर्चा करणार आहोत. तर विषयाचे नाव आहे 'माहितीपट:संकल्पना आणि स्वरूप'. तर विद्यार्थ्यांनो तुम्ही आजपर्यंत अनेक चित्रपटे पाहिलेली असतील. त्याचबरोबर युट्यूबरसुध्दा अनेक चित्रपटे असेल किंवा माहितीपट पाहिलेले असेल. त्याला आपण इंग्रजीमध्ये डॉक्यूमॅन्टरी म्हणतो. तुम्ही डॉक्यूमॅन्टरी युट्यूबरसुध्दा पाहिलेले असतील. तर याच्याच संदर्भात आज आपल्याला विचार करावयाचा आहे. एकूणच आपला आजचा विषय आहे 'माहितीपट: संकल्पना आणि स्वरूप'. याच्यामध्ये आपण माहितीपट म्हणजे काय? एकूण माहितीपटाचे स्वरूप कसे असते? यासंदर्भात आज आपण इथे विचार करणार आहोत. तर सर्वात आधी माहितीपटाची संकल्पना जी आहे ती आपण समजून घेऊया. तर इंग्रजीमध्ये ज्याला आपण डॉक्यूमॅन्टरी म्हणतो त्यालाच आपण मराठीमध्ये माहितीपट म्हणतो. तर माहितीपट दृक-श्राव्य माध्यम आहे. दृक म्हणजे आपण पाहू शकतो आणि श्राव्य म्हणजे आपण ऐकू शकतो. एकाच वेळेला आपण पाहू शकतो व एकाच वेळेला आपण ऐकू शकतो. आपण चित्रपट पाहिलेला असेल, तर चित्रपट आपण एकाच वेळेला पाहू शकतो व ऐकू शकतो. तर अशाच

पध्दतीचा एक प्रकार आहे ‘’माहितीपट’. तर माहितीपटाच्या संदर्भात आपल्याला पुढे विचार करायचा आहे. तर माहितीपटामध्ये वस्तुस्थिस्तीचे चित्रण केलेले असते. म्हणजे पाहा जे काही घडलेलं असेल, जे काही घडत आहे याचे चित्रण माहितीपटामध्ये केले जाते. त्याचबरोबर माहितीपटाच्या संदर्भात हॅन्रीक जुआल म्हणून जो लेखक आहे, अभ्यासक आहे त्यांनी याच्यासंदर्भात एक व्याख्या केलेली आहे ती आपल्याला पाहावयाची आहे. जेव्हा तुम्ही ही व्याख्या पाहणार तेव्हा तुम्हाला एकूणच माहितीपट म्हणजे काय हे तुम्हाला नक्की कळेल. तर पाहा “माहितीपट हा चित्रपटासारखाच प्रकार असून तो सत्य घटना व खऱ्या खुऱ्या माणसांवर आधारित असतो.” आपण एक एक ओळ समजून घेऊन पुढे जाऊया. ते म्हणतात माहितीपट जो आहे तो चित्रपटासारखाच एक प्रकार आहे. तुम्ही सगळ्यांनी चित्रपट पाहिलेला असेल तर हा जो प्रकार आहे त्याच पध्दतीचा प्रकार आहे. त्याचबरोबर हा जो प्रकार आहे तो सत्य घटना व खऱ्या खुऱ्या माणसांवर आधारित असतो. हा जो माहितीपट प्रकार आहे तो सत्य घटनेवर आधारित असतो. इथे कल्पनेला काही वाव नाही, तर सत्य घटनेवर आधारित असतो. तर पाहा एखाद्या गावामध्ये जर पाणी नाही त्याच्यासंदर्भात तुम्ही एखादा माहितीपट काढू शकता. म्हणजे तुम्ही त्यामध्ये दाखवू शकता लोकं जी आहे ती २-३ किं.मी चालत जाऊन पाणी आणते आहे. तर एक प्रकारे माहितीपट खऱ्या घटनांवर व खऱ्या खुऱ्या माणसांवर आधारित असतो. तर तिथे येणारी माणसं जी आहे,पात्र जी आहे ती खरी खुरी असतात. ती कल्पनेतील किंवा ॲक्टींग करणारी पात्रे नसतात तर ती खरी खुरी पात्रे असतात. तर पुढे ते म्हणतात “त्यामध्ये एखादी घटना किंवा ऐतिहासिक बाब खरी व वस्तुनिष्ठ पध्दतीने मांडली जाते”. तर एखादी घटना असेल, ऐतिहासिक बाब असेल जी घडून गेलेली आहे तीसुध्दा आपण माहितीपटाच्या द्वारे ती आपण जीवंत शकतो. तर ऐतिहासिक बाब वस्तुनिष्ठ पध्दतीने म्हणजे जे आहे ते आहे म्हणजेच कल्पनेतलं काही न वापरता खरं खुरं जे आहे ते इथे माहितीपटामध्ये सांगितलेलं असतं किंवा माहितीपटामध्ये चित्रित केलेलं असतं. त्याच्यानंतर ते पुढे म्हणतात “माहितीपट हा प्रकार वास्तव मांडण्याचा किंवा दर्शविण्याचा प्रकार असून त्याचे चित्रिकरण घटनेच्या ठिकाणी जाऊन केले जाते व कोणत्याही प्रकारचे कलावंत न वापरता पूर्वनियोजितपणा न आणता केले जाते”. तर पाहा हा जो प्रकार आहे व आत्तापर्यंत जे आपण पाहिलेलं आहे याच्यावरून आपल्याला समजतं की हा जो प्रकार आहे तो वास्तव मांडण्याचा प्रकार आहे. म्हणजे जे काही घडलेलं आहे ते मांडण्याचा प्रकार आहे. चित्रिकरण, आपण ज्याला शुटिंगही म्हणू शकतो ते चित्रिकरण प्रत्यक्ष त्या घटनेच्या ठिकाणी जाऊन आपल्याला करावं लागतं. त्याच्याबरोबर त्यांनी म्हटलेलं आहे कोणतेही कलावंत न वापरता, ज्याना आपण ॲक्टर म्हणतो. तर कोणतेही कलावंत आपल्याला इथे वापरता येत नाही आणि पूर्वनियोजितपणा किंवा पूर्वतयारी आणता येत नाही. तुम्ही

वेगवेगळी चित्रपटे पाहिलेली असेल तेंव्हा दिग्दर्शक त्यांना सांगतो अशाच पध्दतीने अभिनय करायचा आहे. तर इथे दिग्दर्शक  सांगत नाही की तुम्ही अशाच पध्दतीने अभिनय करा. इथे दिग्दर्शक प्रभावहीन असतो. तर इथे या व्याख्येवरून तुम्हाला कळेल की एकूणच माहितीपट म्हणजे काय व एकूणच माहितीपटाचे स्वरूप कसे असते इथे थोडक्यात माहिती मिळालेली असेल. त्याच्यानंतर पाहा माहितीपटाच्या संदर्भात जर आणखी खोलवर विचार केला, तर पाहा माहितीपट म्हणजे काय? एका वाक्यामध्ये जर सांगायचं झालं तर सांगता येतं. तर पाहा "प्रत्यक्ष घडलेल्या घटना नोंदविणारा दूरचित्रवाणीवरील कार्यक्रम म्हणजे माहितीपट" हे लक्षात ठेवा. जेव्हा एकप्रकारे आपण माहितीपट काढतो किंवा आपल्याला एखादा माहितीपट तयार करायचा असतो तेव्हा इथे संशोधन जे आहे, रीसर्च ज्याला आपण म्हणतो ते इथे महत्त्वाचे आहे. पाहा एखादा विषय तुम्ही निवडलेला आहे किंवा एखादी समस्या असेल त्याच्यावर तुम्हाला एखादा माहितीपट काढायचा असेल तेव्हा त्या विषयाची भौगोलिक असेल, शास्त्रीय असेल, सांस्कृतिक असेल याचे सखोल संशोधन तुम्हाला आधी करावं लागेल नंतरच त्याच्यावर तुम्ही माहितीपट तयार करू शकता. त्याच्याबरोबर इथे काल्पनिक प्रसंगाला इथे स्थान नाही हे लक्षात ठेवायचं. पाहा एखादी तुम्ही कादंबरी वाचली आणि त्या कादंबरीच्या आधारे तुम्ही माहितीपट काढू शकत नाही. तुम्ही चित्रपट काढू शकता. पण जेव्हा आपण माहितीपटाचा विचार करतो तेव्हा काल्पनिक प्रसंगाना इथे स्थान नाही हे तुम्ही लक्षात ठेवायला पाहिजे. म्हणजे काही तरी घटना आधी घडलेली असायला पाहिजे , काही तरी घडत आहे, वास्तवामध्ये काही तरी घडत आहे याच्यासंदर्भात तुम्ही एखादा माहितीपट काढू शकता. त्याच्यानंतर पाहा इथे सत्याला महत्त्व असतो. पाहा माहितीपटाच्या संदर्भात जर आपण विचार केला तर कल्पनेतलं काहीच वापरू शकत नाही. जे काही सत्य आहे, जे काही घडत आहे , वास्तवामध्ये जे काही घडत आहे याच्यासंदर्भातच विचार करावा लागेल. तर माहितीपट पाहणारा जो व्यक्ती असेल तो जेव्हा पाहतो तेव्हा नक्कीच तो एखादी तो भूमीका घेतो. म्हणजे पाहा एखादा माहितीपट काढताना एखाद्या गावामध्ये जर पाणी नाही तर त्या गावात पाणी का नाही? म्हणजे कारण काय आहे ? याच्यासंदर्भात कारणमींमासा इथे होत असते. त्याचबरोबर माहितीपटाचा पुढे विचार केला तर पाहा ऐतिहासिक असेल, सामाजिक असेल, राजकीय असेल या सगळयाचे समग्र दर्शन आपण माहितीपटातून घडवू शकतो. त्याचबरोबर तुम्ही बातम्या वगैरे ऐकलेल्या असाल किंवा वर्तमान पत्रांवरसुध्दा बातम्या पाहिलेल्या असाल त्या बातम्या लगेच कालबाह्य होतांना दिसतात पण माहितीपट जर आपण काढला तर तो लगेचच काल्यबाह्य होत नाही हे त्याचे वैशिष्ट्य आहे किंवा गुण आहे. तर इथे कल्पित घटना असेल, प्रसंग असेल किंवा व्यक्तिच्या संदर्भात माहितीपट निर्माण होऊ शकत नाही. तर कल्पनेला इथे स्थानच नाही हे लक्षात ठेवायला पाहिजे. केवळ इथे प्रश्न

उपस्थित करून चालणर नाही तर प्रश्नांबरोबर कारणमींमासा जी आहे म्हणजेच तो प्रश्न उपस्थित का झाला? कशामुळे झाला? याच्यासंदर्भात विचार जो आहे तो करावा लागतो. त्याच्यानंतराचा मुद्दा आहे माहितीपटाचे स्वरूप, याच्यासंदर्भात आपण विचार करणार आहोत. तर एकूण पाच मुद्दांमध्ये माहितीपटाचे स्वरूप समजून घेणार आहोत. तर पाहा पहिला मुद्दा आहे 'वास्तववादी मांडणी'. याच्यासंदर्भात आपण आधीसुध्दा विचार केलेला आहे. जे तुम्ही मांडणार आहोत ते वास्तवामध्ये घडलेलं आहे, घडत आहे याच्यासंदर्भात वास्तववादी मांडणी जी आहे ती अपेक्षित आहे. वास्तव संघर्श असेल त्या लोकांचा किंवा वास्तव व्यक्ती जी आहे त्याच्याआधारे माहितीपट तयार करावा लागेल. दुसरा जो मुद्दा आहे तो आहे 'एकच एक विषय व एकच एक संदेश असतो'. एक विषय म्हणजे पाण्याच्या संदर्भात जर म्हटलं तर एकच विषय घेऊन तो माहितीपट प्रेक्षकांसमोर येणार आहे. त्याच्यानंतरचा मुद्दा आहे 'विषयाशी बांधीलकी' तुम्ही त्या विषयाशी बांधील असायला पाहिजे. एखादा विषय घेऊन तुम्ही येता, तेव्हा त्या विषयाच्या संदर्भात बोलायला पाहिजे. म्हणजे त्या विषयाला धरून बोलायचं आहे व त्याआधारे माहितीपट तयार करावयाचा आहे. पाहा इथे मनोरंजनाला इथे वाव नाही हे सुध्दा तुम्ही लक्षात ठेवलं पाहिजे. इथे दिग्दर्शक जो असतो तो प्रभावहीन असतो म्हणजे पाहा इथे दिग्दर्शकाला जास्त महत्त्व नसतो कारण जी पात्रं असतात ती खरी खुरी वास्तवातील पात्र असतात. दिग्दर्शक त्यांना असं करा, तसं करा म्हणत नाही. हेसुध्दा आपण लक्षात ठेवलं पाहिजे आणि सर्वात शेवटचा मुद्दा जो आहे तो आहे 'विश्वासार्हाता'. तुम्ही जेव्हा एखादा माहितीपट काढता तेव्हा तो विश्वसनीय वाटला पाहिजे. म्हणजे एकप्रकारे तो माहितीपटाचा आत्माच आहे हे तुम्ही लक्षात ठेवलं पाहिजे. तर आपण इथे माहितीपट म्हणजे काय वेगवेगळया व्याख्यांच्या आधारे समजून घेतलेलं आहे . त्याचबरोबर माहितीपटाचे स्वरूप कसे आहे याच्यासंदर्भातसुध्दा आपण विचार केलेला आहे. धन्यवाद.